RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

"(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Universities Act, 1994.)"

**Office of the Controller of Examinations**
**(Revaluation Section)**
**Examination Bhawan, Laxminarayan Institute of Technology Premises,**
**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur-440033**

No. RTMNU/Revaluation./2020/ Dated :

# पुनर्मुल्यांकनाचे अर्ज ऑनलाईन करण्याबाबतच्या कार्यवाहीबाबतचे परिपत्रक

विषय: **अध्यादेश क्रमांक ९/२०१४ मधील तरतूदीनुसार सरळ पुनर्मुल्यांकनाकरिता महाविद्यालयामार्फत ऑनलाईन आवेदन करण्यासाठी सर्व संबधित महाविद्यालयाकरिता 'ऑनलाईन सुविधा विद्यापीठ संकेतस्थळ www.nagpur.university यावर Apply for Revaluation या लिंकवर उपलब्ध करून देण्यात आल्याच्या माहितीबाबत**

पुनर्मुल्याकन संबंधी अध्यादेश क्रमांक ९/२०१४ अन्वये होत असून सदर अध्यादेशाव्दारे पुनर्मुल्यांकनाची प्रक्रिया अधिक प्रभावी आणि तत्परतेने निकाल जाहिर होण्याच्या दृष्टिकोणातून सर्व संबधित महाविद्यालयांनी खालीलप्रमाणे कार्यवाही घ्यावी '

१) अध्यादेश क्रमांक ९/२०१४ मधील तरतूदीनुसार विद्यार्थ्यांना सरळ पुनर्मुल्यांकनाकरिता दोन विषयात आवेदन करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. पुनर्मुल्यांकनाकरिता संबधित महाविद्यालयामार्फत ऑनलाईन अर्ज करता येईल. अध्यादेश क्रमांक ९/२०१४ मधील तरतूदीनुसार उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (झेराक्स) मिळणार नाही.

२) मुळ निकाल जाहिर झाल्यानंतर महाविद्यालयात प्रवेशित नियमित विद्यार्थी ७ दिवसाच्या आंत महाविद्यालयात ऑनलाईन आवेदनासाठी प्रक्रिया करतील. ज्या विषयात पुनर्मुल्यांकनासाठी आवेदन करावयाचे आहे त्याकरिता गुणपत्रिकेचा झेराक्स प्रतीसह प्रतिविषय रू. १६०/– प्रमाणे पुनर्मुल्यांकन शुल्कासह आवेदन महाविद्यालयात सादर करतील.

३) विद्यार्थ्याकडून निर्धारित शुल्कासह पुनर्मुल्यांकनासाठी आवेदन प्राप्त झाल्यानंतर पुढील तीन दिवसात संबधित महाविद्यालयामार्फत ऑनलाईन आवेदन भरून सर्व विषयनिहाय विद्यार्थ्यांची यादी (एस–१) व फक्त धनाकर्षाव्दारे (Demand Draft) भरलेल्या शुल्काचा तक्ता (एस–२) व पावती दहाव्या दिवशी **(मुळ निकाल जाहिर झाल्याचा दिवस वगळून)** महाविद्यालयाच्या लेटरहेडवर कव्हरींग लेटर वर प्राचार्याच्या स्वाक्षरीसह पुनर्मुल्यांकन विभागात पडताळणी करण्याकरिता सादर करतील. धनाकर्ष विद्यापीठाच्या लेखा विभागात जमा करून लेखा विभागातून प्राप्त पावती पुनर्मुल्यांकन आवेदनपत्रासोबत संलग्न करून पुनर्मुल्यांकन विभागात सादर करणे आवश्यक आहे.

३) पुनर्मुल्याकन विभागाकरिता पडताळणी करून मान्य झाल्यानंतर सादर करण्यात आलेल्या पुनर्मुल्यांकन आवेदनावर पुनर्मुल्यांकनाची कार्यवाही घेण्यात येईल.

४) निर्धारित कालावधीत म्हणजे मुळ निकाल जाहिर झाल्याचा दिवस वगळून पुढील १० दिवसात ऑनलाईन आवेदनाची हार्ड कॉपी निर्धारित शुल्काची ऑनलाईन प्रती सादर करण्यात आल्या नसतील तर

अशा प्रकरणामध्ये पुनर्मुल्यांकनाची कार्यवाही घेता येणार नाही याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी व याला संबधित महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहिल.

५) ऑनलाईन सुविधा विद्यापीठ विद्यापीठ संकेतस्थळ **www.nagpur.university** यावर **Apply for Revaluation** या लिंकवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

६) पुनर्मुल्याकंनाचे आवेदन ऑनलाईन पध्दतीने महाविद्यालयामार्फत भरावयाचे आहे. व्यक्तिगतरित्या विद्यार्थ्यांचे आवेदन महाविद्यालयामार्फत पाठविण्यात न आल्यास स्विकारले जाणार नाहीं. तसेच मॅन्युएल आवेदन तसेच रोख स्विकार करण्यात येणार नाही याची सर्व संबधित महाविद्यालयानी नोंद घ्यावी.

७) १० दिवसाचा निर्धारित कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुनर्मुल्यांकनाचे आवेदन स्वीकार करण्यात येणार नाही.

८) नियमित प्रवेशित विद्यार्थ्यांची कामे किंवा त्यांच्या कोणत्याही समस्याचे समाधान महाविद्यालयामार्फत होणे बंधनकारक आहे. कोणत्याही महाविद्यालयाने आपल्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांना पुनर्मुल्यांकन विभागात पाठवू नये.

९) बहि:शाल विद्यार्थ्यांनी आपले सर्व कामे परीक्षा विभागात स्थापित सुविधा केंद्रामार्फत किंवा ज्या महाविद्यालयामार्फत आपले मुळ परीक्षा आवेदन सादर केले असतील पुनर्मुल्यांकनाची आवेदने सुध्दा त्याव्दारे सादर करतील. त्यांची आवेदने प्रत्यक्ष पुनर्मूल्यांकन विभागात स्वीकार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१०) निर्धारित कालावधीत प्राप्त पुनर्मुल्यांकनाचे आवेदन पडताळणी करून पुनर्मुल्यांकन विभागाने आवेदन बरोबर असल्याची खात्री करून संगणकामार्फत संबधित संगणक एजन्सीला कळविणे बंधनकारक आहे.

११) आवेदनपत्राची पडताळणी झाल्याची माहिती झाल्याची सुचना संगणकामार्फत संबधित एजन्सीला कळविल्यानंतर संबधित संगणक एजन्सीने रिक्वीजिशन दुस—यादिवशी न चुकता पूनर्मुल्यांकन विभागात पाठविणे बंधनकारक आहे. रिक्वीजिशन प्राप्त झाल्यानंतर पुनर्मुल्यांकन विभागातील संबधित लिपीकानी त्वरित केंद्रिय पुनर्मुल्यांकन विभागत पाठवून त्याची नोंद घ्यावी.

१२) अध्यादेशातील तरतूदीनुसार पुनर्मुल्यांकनाचे निकाल ३० दिवसात जाहिर होणे बंधनकारक आहे याची सर्वस्वी जबाबदारी केंद्रिय मुल्यांकन केंद्र आणि पुनर्मुल्यांकन विभागाची आहे याची सर्व संबधितानी नोंद घ्यावी.

१३) कोणत्याही स्तरावर विलंब होत असल्यास त्याबाबतची सुचना त्वरित संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांना देण्यात यावी व अडचणींचे निराकरण वेळीच करावे.

१४) पुनर्मुल्यांकन निकालाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निकाल विद्यापीठ संकेतस्थळावर गुणपत्रिकेसह प्रकाशित करून उपलब्ध करून देण्यात येत असते त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यांनी निकालाबाबत पुनर्मुल्यांकन विभागात येवून कोणतीही चौकशी करू नये. डिव्हिजनसाठी स्थगित निकालासंदर्भात विद्यार्थ्यांनी सरळ महाविद्यालयात चौकशी करून आवश्यक कागदपत्रे महाविद्यालयात सादर करावे व महाविद्यालयीन लिपीकानी पुनर्मुल्यांकन विभागात येवून संबधित विद्यार्थ्यांचे निकाल क्लिअर करावे. कोणत्याही परिस्थतीतीमध्ये विद्यार्थ्यांना पुनर्मुल्यांकन विभागात कोणत्याही चौकशीसाठी पाठवू नये.

१५)  पुनर्मुल्यांकनाचे निकालाची प्रत व गुणपत्रिका फक्त महाविद्यालयीन लिपीकाकडेच सुपूर्द करण्यात येईल. प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना गुणपत्रिका देण्यात येणार नाही याबाबतची नोंद सर्व संबधित महाविद्यालयानी घेण्यात यावी.

१६)  ऑनलाईन प्रक्रिया त्वरित अंमलात आलेली आहे. ऑनलाईन आवेदन करतांना कोणतीही अडचण निर्माण होत असल्यास नमूद मदतक्रमांक वर आवश्यक मदत प्राप्त करून घ्यावी.

(डॉ. प्रफुल्ल साबळे)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर.